अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# भाजपा आणि काँग्रेसपुढे संघर्षाचे आव्हान

आगामी विधानसभा निवडणुकीत आपले अस्तित्व कसे टिकवायचे असा भला मोठा प्रश्न काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसपुढे निर्माण झाला आहे. तर भाजपा आणि शिवसेनेमध्ये ज्यावेळी जागा वाटपावरून मोठा संघर्ष उभा राहण्याची चिन्हे दिसत आहेत. विधानसभा निवडणुकीला काही महिनेच शिल्लक राहिले असताना आपल्या बालेकिल्ल्याला जागोजागी पडलेली भगदाडे कशी बुजवायची याच्या विवंचनेत दोन्ही काँग्रेसचे नेते सापडले आहेत. कितीही प्रयत्न केला तरी या विधानसभा निवडणुकीत पूर्वीसारखा विजय आपल्याला मिळणार नाही याची पूर्ण खात्री दोघांनाही वाटत आहे. फक्त कमीत कमी नुकसान कसे होईल याचा विचार करणे असाच खरे तर त्यांच्यासमोर पर्याय शिल्लक राहतो. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र हा काँग्रेससाठी एक भक्कम बालेकिल्ला मानला गेला.

देशामध्ये कुठेही मोठी पडझड झाली तरी अनेकवेळेला महाराष्ट्राने काँग्रेसला तारून नेण्याची उदाहरणे आहेत. त्यावेळच्या लोकसभा निवडणुकीतसुध्दा काँग्रेसची महाराष्ट्रावर मोठी भिस्त होती. परंतु काँग्रेसची घोर निराशा झाली. जिथे तीस बत्तीस जागांची अपेक्षा बाळगली गेली होती तिथे काँग्रेसला चार जागांवर समाधान मानावे लागले. आता विधानसभा निवडणुकीमध्ये अशा प्रकारची धुळधाण होऊ नये थोडीफार तरी लाज राखली जाईल अशा जागा कायम ठेवण्यासाठी दोन्ही पक्षांना प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. त्या प्रयत्नांमध्ये कोणकोणत्या गोष्टींचा समावेश करावा याचा विचार सुरू झालेला दिसतो. प्रामुख्याने सामान्य मतदारांचे लक्ष वेधण्यासाठी पुन्हा एकदा लोकप्रिय घोषणांचा पाऊस पाडावा त्यात घरांचा मुद्दा पुढे करून स्वस्तातली घरे उपलब्ध करून देण्यासाठी भली मोठी योजना किंवा घोषणा करणे शक्य आहे का अशी चाचपणी सुरू झालेली दिसते. याशिवाय राज्यातील तरुणांची मते आपल्याकडे खेचण्यासाठी त्यांना उद्योग व्यवसायासाठी अत्यंत अल्प व्याजदरात घसघशीत कर्जे कशी उपलब्ध करून देता येतील आणि ग्रामीण भागामधल्या घरकुल योजना वेगाने पूर्ण करून मतांचा साठा कायम कसा ठेवता येईल अशा काही योजनांचा काँग्रेस नेत्यांमध्ये विचारविनिमय सुरू झाल्याचे दिसून येते. अशा प्रकारची उपाययोजना केल्याशिवाय दोन्ही काँग्रेसला पर्याय उरलेला नाही. अन्यथा आताच व्यक्त झालेल्या अंदाजाप्रमाणे २८८ जागांपैकी २३३ जागा या महायुतीच्या पारड्यात जातील असे चित्र पुढे आले आहे. म्हणजेच पुन्हा राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीत चाळीसच्या आत काँग्रेसला आपला गाशा गुंडाळावा लागेल.

### चिंताक्रांत दोन्ही काँग्रेस

या सगळ्या लोकसभा निवडणुकीचा सर्वाधिक फटका राज्याच्या दृष्टीने राष्ट्रवादी काँग्रेसला बसला आहे.शरद पवार यांनी यावेळची लोकसभा निवडणूक विशेष प्रतिष्ठेची केली होती. स्वत: निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आणि आपला बराचसा वेळ त्यांनी प्रचारासाठी दिला. उमेदवारांची निवड करतानाही बराच विचारविनिमय केला. छगन भुजबळ, सुनील तटकरे यांच्यासारख्यांना मैदानात उतरवले. परंतु त्यांना देखील चारी मुंड्या चित करून युतीचे उमेदवार निवडून आले. या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला जवळपास अठरा ते वीस जागांची आवश्यकता होती. केंद्रामध्ये आघाडीचेच सरकार येईल आणि त्यात आपण आपल्या या वीस खासदारांच्या जोरावर बराच काही रुबाब निर्माण करू शकू. असा होरा पवारांनी बांधला होता.

परंतु पवारांसारख्या कसलेल्या राजकीय नेत्यालासुध्दा हा छुपा मोदींचा अंडरकरंट लक्षात आला नाही. कधी मोदी यांची लाट आहे असे त्यांना वाटायचे तर कधी अशी कोणतीही लाट नाही असे विधान करून आपला आत्मविश्वास दाखवून देत होते. इतका मोठा पराभव होऊनही दोन्ही पक्षांमध्ये पाहिजे तशा उपाययोजनेला तातडीने सुरुवात झालेली दिसत नाही. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे तर अजूनही मोदींची लाट बीट काही नव्हती असे म्हणत आहेत. खरे तर अशा प्रकारचा अतिआत्मविश्वास काँग्रेसच्या पराभवाला कारणीभूत ठरला आहे. आता विधानसभा निवडणुकीत आपली धुळधाण उडू शकते. याचा विचार करून जर हे दोन्ही पक्ष कामाला लागले तरच काहीतरी हाताशी लागेल.अन्यथा देशभर मोदींची लाट आणि दोन्ही काँग्रेसच्या बरबादीची वाट असे चित्र पुन्हा निर्माण होईल. वेळ थोडा आणि महायुतीचे महाआव्हान असे अतिशय विरुध्द चित्र काँग्रेसपुढे निर्माण झालेले आहे. आता पराभवाच्या मिमांसेपेक्षा विजयाचा नवा विश्वास निर्माण करावा लागेल. अन्यथा पुढची पाच वर्षे विश्रांती घ्यावी लागेल त्याची तयारी दोन्ही काँग्रेसने ठेवलेली बरी.

### भाजपाचा अतिउत्साह

अर्थात त्या सगळ्या अनुकूल परिस्थितीमध्ये सेना भाजपाचे नेते किती जमिनीवर राहतात हाही एक मोठा प्रश्न आहे.प्रामुख्याने भारतीय जनता पार्टीचे नेते सध्या हवेत उडत आहेत.लोकसभा निवडणुकीत भाजपामुळे शिवसेनेच्या जागा वाढल्या. आता विधानसभा निवडणुकीत सेनेने भाजपाला जास्त जागा द्याव्यात असा हट्ट करायला सुरुवात केली आहे. राजकारणामध्ये सत्ता हीच सर्वस्व असते. गेली पंचवीस वर्षे या दोन पक्षांची मैत्री आहे. परंतु आता फायद्याचा हंगाम सुरू झाल्याबरोबर मित्रालाच डिवचण्याचे उद्योग भाजपाने सुरू केले आहेत. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीतही भाजपाला जास्त जागा मिळतील असा या नेत्यांचा अंदाज आहे. कदाचित तसे होऊही शकेल.

परंतु आता पूर्वीचा जागा वाटपाचा फॉर्म्यूला बदलून भाजपाला ११७ऐवजी १५० जागा हव्या आहेत. परंतु आतापर्यंतच्या विधानसभा निवडणुकांमध्ये या ११७जागांपैकी निम्म्या जागासुध्दा या पक्षाला निवडून आणता आलेल्या नाहीत. दोन्ही पक्षांच्या विजयाची टक्केवारी काढली तर ती यथातथाच होती. खरे तर भाजपाला स्वत:च्या विजयाचा एवढा आत्मविश्वास असेल तर त्यांनी अतिउत्साह दाखवता कामा नये. त्या ११७जागा सगळ्याच्या सगळ्या निवडून आणण्यासाठी आपली ताकद पणाला लावावी.किंवा ११७ वरून एकदम १५० जागांची मागणी करण्याऐवजी समजून उमजून आणि कटूता न येऊ देता पाच दहा जागा वाढवून घेण्याची तयारी ठेवावी. कदाचित १५० जागांची मागणी केल्यावर सेना नेते पाच दहा जागा देतील अशा अंदाजानेच भाजपाच्या प्रदेश नेत्यांनी हे दबाव तंत्र सुरू केलेले दिसते. आता याला सेना नेते किती भीक घालतात यावर सगळे अवलंबून आहे. परंतु या जागा वाटपावरून दोघांमध्ये मोठा संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे आहेत.